आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक  बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
०६ मे २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची अधिसूचना चार आठवड्यात काढण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे राज्य निवडणूक आयोगाला निर्देश

- राज्यातल्या विविध तीर्थक्षेत्रांच्या विकासाकरता ५ हजार ५०३ कोटी रुपये निधीला राज्य मंत्रीमंडळाची मंजुरी

- पहलगाम हल्ल्यानंतर युद्धसदृश स्थितीची शक्यता लक्षात घेऊन देशात २४४ ठिकाणी उद्या युद्धस्थितीतला नागरी संरक्षण सराव केला जाणार

- भारताची अर्थव्यवस्था यंदा जपानला मागे टाकून जगात चौथ्या क्रमांकावर जाण्याचा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा अंदाज

**आणि**

- येत्या दोन दिवसात, राज्यातल्या चारही विभागांमधे वादळी पाऊस, तर  तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता

**<><><><><>**

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची अधिसूचना चार आठवड्यात काढण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. ओबीसी आरक्षणाच्या अंमलबजावणी संदर्भात न्यायालयात याचिका दाखल असल्यानं २०२२ पासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. जुलै २०२२ मधे बाठिया आयोगाचा अहवाल येण्याआधी ओबीसी आरक्षणाबाबत जी तरतूद होती त्यानुसार या निवडणुका घ्याव्यात असं, न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंह यांच्या पीठानं आज

सांगितलं. निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया चार महिन्यांच्या आत पूर्ण करायच्या सूचनाही न्यायालयानं राज्य निवडणूक आयोगाला दिल्या.

**<><><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या चौंडी इथं आज मंत्रिमंडळाची बैठक झाली. राज्यातल्या विविध तीर्थक्षेत्रांच्या विकासाकरता ५ हजार ५०३ कोटी रुपये निधीला या बैठकीत मंजुरी दिल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी बैठकीनंतर वार्ताहर परिषदेत सांगितलं. यात अष्टविनायक गणपतींच्या जिर्णोद्धारासाठी १४७ कोटी, तुळजाभवानी मंदिर विकास आराखड्यासाठी १८६५ कोटी, जोतिबा मंदिर विकास आराखड्यासाठी २५९ कोटी, त्र्यंबकेश्वर विकास आराखड्यासाठी २७५ कोटी, महालक्ष्मी मंदिर १४४५ कोटी आणि माहूर गडासाठी ८२९ कोटी मंजूर करण्यात आले आहेत. अहिल्यादेवींनी जे कार्य केलं होतं तेच राज्य सरकार करत आहे, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**यशवंत** विद्यार्थी योजने अंतर्गत धनगर समाजातल्या दहा हजार विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी शाळांमधे प्रवेश दिला जाणार, विभागस्तरावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वसतिगृह योजना सुरू करणार, मुलींसाठी आयटीआय स्थापन करणार अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. अहिल्यानगर जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारायला तसंच जिल्ह्यात दिवाणी न्यायालय स्थापन करायला मान्यता दिल्याचंही त्यांनी सांगितलं. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळाचं जतन आणि संवर्धन करण्यासाठी ६८१ कोटी रुपयांच्या आराखड्याला मंजुरीही देण्यात आली आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान राबवणार,  पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी उभारलेल्या घाट, विहिरी, पाणीवाटप प्रणालीचं सर्वेक्षण करुन त्यांच्या जतनासाठी विशेष योजना राबवणार, अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर शासनामार्फत चित्रपट

तयार करण्यात येणार असल्याची घोषणाही मुख्यमंत्री फडनवीस यांनी यावेळी केली.

अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दीच्या निमित्ताने एक **लोगो** प्रकाशित करण्यात आला आहे. तसंच एक **डाक तिकीट**ही जारी केलं आहे.

**विकसित** महाराष्ट्र, ई-गव्हर्नन्स विषयक सुधारणा आणि सेवा विषयक प्रशासकीय सुधारणा या तीन बाबींवर आधारित दीडशे दिवसांचा कृती आराखडा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज जाहीर केला.

**<><><><>**

अहिल्यानगर इथं पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सहकारी सूतगिरणी, तसंच चौंडी ते निमगाव डाकू रस्त्याचं भूमीपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते आज झालं. या सूतगिरणीसाठी ९१ कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली असून कापूस उत्पादक शेतकऱ्यांना त्याचा थेट लाभ होणार आहे.

**<><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान दरम्यान तणावाच्या पार्श्वभूमीवर युद्धस्थिती उद्भवण्याची शक्यता गृहीत धरून देशात २४४ ठिकाणी उद्या मॉक ड्रिल म्हणजे युद्ध सज्जता सराव करण्याचे आदेश केंद्रिय गृह मंत्रालयानं दिले आहेत. अतिसंवेदनशील ठिकाणांमधे मुंबई, उरण आणि तारापूर यांचा समावेश आहे. त्याखेरीज ठाणे, पुणे, नाशिक, रोहा-धाटाव-नागोठणे, मनमाड, सिन्नर, थळ-वायशेत, पिंपरी-चिंचवड, छत्रपती संभाजीनगर, भुसावळ, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या ठिकाणी मॉकड्रील घेण्यात येणार आहे.

केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन यांनी आज त्यासंदर्भात सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांची बैठक घेतली. नागरी संरक्षण विभागाचे महासंचालक, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे महासंचालक आणि इतर संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

हल्ला झाला तर सुरक्षेच्या दृष्टीनं करण्याच्या हालचालींविषयी नागरिकांना, विशेषतः विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणं, तसंच धोक्याचा इशारा देणारी यंत्रणा, नियंत्रण कक्ष, इत्यादींची सज्जता तपासून पाहणं हा या सरावाचा भाग आहे.

दरम्यान पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित दोवाल यांची आज भेट झाली. प्रधानमंत्र्यांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीत सुमारे ४० मिनिटं  महत्त्वपूर्ण बाबींवर चर्चा झाली.

**<><><><>**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांना आज अभिवादन करण्यात येत आहे. सामाजिक समता प्रस्थापित करणारे, बहुजनांचे तारणहार असलेले शाहू महाराज यांच्या महान विचार आणि कार्याला शतश: प्रणाम, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शाहू महाराजांना अभिवादन करताना म्हटलं आहे सामाजिक परिवर्तनाला गती देत समाज विकासात शाहू महाराजाचं योगदान अमूल्य असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शाहू महाराजांना अभिवादन करतांना म्हटलं आहे.

**<><><><>**

भारताच्या जीडीपीमधे चालू वर्षात वाढ होऊन तो ४ हजार १८७ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची शक्यता असल्याचं आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अहवालात म्हटलं आहे.  भारतीय अर्थव्यवस्था जपानला मागे टाकून जगात चौथ्या क्रमांकावर पोहोचण्याची शक्यता नाणेनिधीने वर्तवली आहे. जगातली सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था हे स्थान भारतानं यंदाही राखलं असून आगामी २ वर्षात वाढीचा दर ६ दशांश टक्के राहील. २०२८मधे भारताचा जीडीपी ५ हजार ५८४ अब्ज डॉलर्सहून जास्त होण्याची शक्यता असून तेव्हा जर्मनीला मागे टाकून भारतीय अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकावर पोहोचेल. जर्मनीचा वाढीचा दर यंदा शून्य

टक्के राहील तर पुढच्या वर्षी २०२६मधे तो ९ दशांश टक्के राहील असा अंदाज आहे. जगातली सर्वात मोठी अर्थव्यवस्था अमेरिकेची असून तिथं जीडीपी ३० हजार ५०७ पर्यंत पोहोचला आहे. दुसऱ्या क्रमांकावर चीन असून त्यांचा जीडीपी १९ हजार २३१ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहे.

**<><><><><>**

जातनिहाय जनगणनेविषयी सर्व राजकीय पक्षांबरोबर संवाद साधावा, अशी मागणी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे. प्रधानमंत्र्यांना त्यांनी तसं पत्र लिहीलं असून त्यात तेलंगण सरकारनं राबवलेल्या जातनिहाय जनगणनेचं प्रारूप केंद्रसरकारनं  पाहावं अशी सूचना केली आहे. आरक्षणावरची ५० टक्क्यांची मर्यादा हटवावी, खासगी शिक्षण संस्थांमधे अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गियांसाठी आरक्षण ठेवावं असे अनेक मुद्दे खरगे यांनी सुचवले आहेत.

दरम्यान खरगे यांच्या पत्रावर भाजपानं टीका केली आहे.

**<><><><><>**

छत्तीसगढ-तेलंगण सीमेवर केजीएच पर्वतांदरम्यान ४ मे रोजी झालेल्या नक्षलविरोधी कारवईत सागर बोराडे हा सीआरपीएफ जवान गंभीर जखमी झाला. सागर हे सीआरपीएफच्या स्पेशल कोब्रा २०४ बटालियनचं नेतृत्व करत होते. या कारवाईत आयईडी स्फोटात जखमी झालेल्या सहकाऱ्याला वाचवण्याच्या प्रयत्नात त्यांनाही दुखापत झाली. त्यांना आधी रायपूर इथे आणि त्यानंतर विशेष विमानाने दिल्लीला उपचारांसाठी पाठवण्यात आलं असून सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे**.**

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट मधे आज संध्याकाळी मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना होणार आहे. हा सामना

थोड्याच वेळात साडे सात वाजता सुरू होईल. गुजरात टायटन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला.

**<><><><><>**

मुंबई मेट्रो लाईन सहासाठी प्रस्तावित असलेल्या कांजुरमार्ग इथल्या कारशेड जमीन प्रकरणात केंद्र आणि राज्य सरकारमधला वाद आता संपुष्टात आला आहे. मेट्रो लाईन ६ च्या कारशेडसाठी हस्तांतरित केलेल्या १५ हेक्टर जमिनीच्या मालकीवरून हा वाद सुरू होता. या प्रकरणी केंद्र सरकारने मुंबई उच्च न्यायालयात याचिकाही दाखल केली होती. या याचिकेवर मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या पीठासमोर सुनावणी झाली. या सुनावणीत अतिरिक्त सॉलिसिटर जनरल अनिल सिंह यांनी जागा कारशेडसाठी देण्याच्या निर्णयाविरोधातली याचिका मागे घेत असल्याचं स्पष्ट केलं. केंद्र आणि राज्य सरकारमधला वाद मिटला असला तरीही या जागेवरून खासगी विकासक आणि राज्य सरकारमधला  वाद अद्याप संपलेला नाही.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, विदर्भात काही ठिकाणी, तर मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्र तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात, राज्यातल्या चारही विभागांमधे तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट, सोसाट्याचा वारा, आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.  तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**